महाराष्ट्र

पोलीस

## स्था.गु.अ.शाखा, कोल्हापूर यांची यशस्वी कामगीरी

**पन्हाळा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. १६३/ २०२१ भा.द.स. २२४ प्रमाणे दाखल गुन्हयातील खुनाच्या गुन्हयामध्ये सुमारे २ वर्षा पासून बंदी रजेवरून फरारी असलेला आरोपी नामे पोपट श्रीपती गायकवाड, भाचरवाडी, पिंपळे तर्फे ठाणे, ता. पन्हाळा, कोल्हापूर यास पकडण्यास स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखा, कोल्हापूर यांना यश**

....................................................................

मा. श्री. शैलेश बलकवडे पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांनी कोल्हापूर जिल्याअंतर्गत सर्व पोलीस ठाणे अभिलेखावर दाखल असले गुन्हयातील पाहीजे फरारी आरोपीत यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन संबंधीत पोलीस ठाणेस पुढील योग्य ते कायदेशीर कारवाई करीता हजर करणे बाबत श्री. महादेव वाघमोड, पोलीस निरीक्षक, स्था.गु.अ.शाखा, कोल्हापूर यांना आदेशीत केले होते.

त्यानुसार आज दि. १३/०५/२०२३ रोजी श्री. महादेव वाघमोडे, पोलीस निरीक्षक, स्था.गु.अ.शाखा, कोल्हापूर यांना गोपनीय माहीती मिळाली होती की, पन्हाळा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. - १६३/ २०२१ भा.द.स. २२४ प्रमाणे दाखल गुन्हयातील सुमारे २ वर्षा पासून खुनाच्या गुन्हयामध्ये बंदी रजेवरून फरार असलेला आरोपी नामे पोपट श्रीपती गायकवाड वय वर्षे - ५०, रा. रेडेकर गल्ली, भाचरवाडी, पिंपळे तर्फे ठाणे, ता. पन्हाळा, कोल्हापूर हा केर्ली बस स्टॉप जोतिबा रोड ता. करवीर जिल्हा कोल्हापूर येथे आज रोजी येणार आहे.

**त्याअनुषंगाने श्री. महादेव वाघमोडे, पोलीस निरीक्षक, स्था.गु.अ.शाखा, कोल्हापूर यांनी स्था.गु.अ.शाखा, कोल्हापूर येथे नेमणुकीस असलेले पोलीस उप निरीक्षक श्री. विनायक सपाटे व पोलीस अंमलदार नामे राम कोळी, रणजित पाटील, सुरेश पाटील व विनोद कांबळे यांना सदर ठिकाणी जावुन खात्री करुन नमुद आरोपी मिळुन आलेस पुढील योग्य ती कारवाई करणे बाबत आदेशीत केले होते. त्यानुसार नमुद पथक यांनी सदर ठिकाणी जावुन वॉच करुन नमुद आरोपीत हा सदर ठिकाणी मिळुन आल्याने त्यास रिपोर्टसह पन्हाळा पोलीस ठाणे येथे हजर केले आहे.**

*********************************************************************